# लोकचळवळीतून कुपोषणमुक्ती

महाराष्ट्रातील नंदुरबार व पालघर या आदिवासी जिल्ह्यासोबतच गडचिरोली जिल्हा कुपोषणात अग्रक्रमांकावर आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्वे- ४नुसार, गडचिरोलीत पाच वर्षांखालील बालकांमध्ये अशक्तपणाचे प्रमाण ५८ टक्के, वयानुसार कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण ४२ टक्के तर खुरटलेल्या बालकांचे प्रमाण ३३ टक्के दिसून आले आहे. गडचिरोलीमध्ये कुपोषणावर मात करण्यासाठी 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेने 'कॅन'(Community Action for Nutrition) या प्रकल्पाच्या माध्यमातून आरमोरी व कुरखेडा तालुक्यात एक वेगळा प्रयत्न केला. कुपोषणावर मात करण्यासाठी लोकसहभागासोबतच लोकप्रतिनिधी, सरकारी अधिकारी व कुपोषित बालकांच्या कुटुंबांचा पुढाकार घेण्यात आला. निवडलेल्या ८० गावांमध्ये सामाजिक कार्यकर्ते मागील एक वर्ष 'गाव एक कुटुंब' ही संकल्पना रुजवित आहेत. लोकांना एकत्रित येऊन गाव कुपोषणमुक्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासाठी गावात मिळणाऱ्या सरकारी सेवा नियमित व चांगल्या दर्जाच्या मिळतील यावर देखरेख, कुपोषणाबाबत ग्रामसभेत सर्व गावकऱ्यांसमोर चर्चा व जनजागृती करीत आहे. आदिवासी भागांमध्ये मुलीचे लवकर लग्न केले जाते. परिणामी आई स्वतः कमी वजनाची असणे. गरोदरपणात पोटभर जेवणही मिळत नाही. प्रसूती झाल्यावर त्यांना महिनाभर घराबाहेर झोपडीत ठेवले जाते. या सर्वांचा परिणाम जन्माला आलेले बालक कुपोषित होण्याची शक्यता वाढते.

आरमोरी तालुक्यातील सुनीताने (नाव बदलले आहे) मार्च २०१९ मध्ये उपकेंद्रात कमी वजनाच्या बाळाला जन्म दिला. आरोग्यसेविकेने पोषण पुनर्वसन केंद्रात दाखल करायला सांगितले. परंतु स्थानिक प्रथेप्रमाणे बाळंतीणीला व बाळाला घराबाहेर एका झोपडीत ठेवले गेले. ही बाब आरोग्यसेविकेने डॉक्टरांना सांगितली. डॉक्टरांनी स्वतः सुनीताची त्वरित भेट घेतली. घरच्यांना बाळाला दाखल करणे का गरजेचे आहे, हे सांगितले. परंतु घरचे तयार झाले नाहीत. प्रकल्पातील कार्यकर्ते गावातील पोषण हक्क गटातील काही व्यक्तींना सोबत घेवून सुनीताच्या घरी गेले. घरच्यांना खूप समजावून सांगितले. तरी देखील ते ऐकण्यास तयार होईनात. मग पर्याय म्हणून बाळाची योग्य काळजी घेवून घरीदेखील त्याचे वजन वाढवू शकतो, असा सुवर्णमध्य काढला. त्याप्रमाणे कुटुंब बाळाची डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार घरी काळजी घेण्यास तयार झाले. दर दोन दिवसांनी बाळाचे वजन वाढते की, नाही याचा पाठपुरावा करण्यात आला. या प्रसंगानंतर आता या गावातील पोषण हक्क गटातील लोकं कमी वजनाची बालके जन्माला आल्यास घरी जाऊन बाळाचे वजन वाढते आहे ना यावर लक्ष ठेवतात.



**न्यायपालिका, कार्यकारी मंडळ, विधिमंडळ आणि प्रसारमाध्यमे हे जसे लोकशाहीचे चार स्तंभ आहेत तसेच कुपोषणमुक्तीचे देखील चार स्तंभ आहेत. पहिला स्तंभ आहे सरकारी अधिकारी, दुसरा लोकप्रतिनिधी, तिसरा स्वतः पालक व चौथा लोकसमुदाय, या चारही स्तंभांनी जर आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तर कुपोषण गावातूनच काय पण समाजातून हद्दपार होईल. लोकचळवळीचा असाच प्रयोग 'कॅन' या आदिवासी विकास विभागाच्या सहकार्याने व साथी संस्थेमार्फत गडचिरोली जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आला आहे.**

कुरखेडा तालुक्यात देखील एका गावात बचत गटातील महिलांनी एकत्र येऊन गावाला कुपोषणातून बाहेर काढण्याची किमया केली आहे. प्रकल्पातून निरीक्षण केले असता, या गावात एकूण २६ बालके कुपोषणात होती. बालकांना घरी देत असलेल्या आहारात काही कमतरता दिसून आल्या. तसेच अंगणवाडीत पाहणी केली असता, मिळणाऱ्या पूरक पोषण आहारातदेखील तोचतोचपणा होता. बालके आहार मनापासून घेत नव्हती असेही लक्षात आले. प्रकल्पातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन ही गोष्ट बचत गटात मांडली. अंगणवाडीसाठी लागणारा भाजीपाला जर अंगणवाडीच्या आवारात परसबागेत पिकवला तर बालकांच्या आहारात विविधता आणता येईल व बालके आहार पोटभर खातील अशी चर्चा झाली. अंगणवाडी कार्यकर्त्या व बचत गटातील महिलांनी मिळून अंगणवाडीच्या आवारात परसबाग लावली. आता या परसबागेतून विविध भाजीपाला काढला जातो व त्याचा वापर बालकांच्या आहारात केला जातो. यामुळे गावातील बालकांचे कुपोषण कमी होण्यास मदत झाली. तसेच परसबागेची निगराणी करण्याची जबाबदारी गावातील सर्व महिलांनी घेतली. या दोन्ही अनुभवांवरून समुदाय एकत्र आला तर कुपोषण कमी करण्यास मदत होऊ शकते हे दिसून आले.

अमृत आहार योजनेचा निधी अंगणवाडीसाठी देण्यात येतो. निधी जमा होण्यास उशीर होत असल्याने काही ठिकाणी योजना बंद होत असल्याचे जिल्हाधिकारी शेखर सिंग यांच्या लक्षात आले. त्यांनी निधीचे वाटप जिल्हा पातळीवरून सरळ अंगणवाडीच्या खात्यात दर तीन महिन्यांनी जमा करण्यात यावा, असा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अमृत आहार योजनेचा लाभ प्रत्येक बालक व मातेपर्यंत वेळेत पोहोचू लागला. स्थानिक पातळीवरील नेमक्या अडचणी समजून गडचिरोलीसाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समन्वयामुळे घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे सरकारी योजना लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचू लागल्या.

कुपोषित बालकांना पोषक आहारासोबतच उपचाराचीही जोड देण्याची गरज असते. अशा बालकांसाठी जिल्हा रुग्णालयात पोषण पुनर्वसन केंद्र चालविले जाते. यामध्ये उपचाराची गरज असणाऱ्या बालकांना १२ ते १४ दिवस भरती करून औषधोपचार व आहार दिला जातो. तसेच पालकांना देखील आहार व बुडीत मजुरी दिली जाते. परंतु बहुतांश पालक आपल्या बालकांना उपचारासाठी दाखल करण्यास तयार होत नाहीत. उपचारांमुळे बालक बरे होऊ शकतात. यासाठी लोकप्रतिनिधींनी लोकांमध्ये जागृती केली तर कुपोषण कमी होऊन बालमृत्यू वाचवू शकतो. पोषण हक्क गटात सक्रिय असलेल्या एका सरपंचांनी स्वतः उपजिल्हा रुग्णालयातील पोषण पुनर्वसन केंद्र मध्ये जाऊन भरती केलेल्या मातांची व बालकांची चौकशी केली. तसेच ही उपचारांची प्रक्रिया आरोग्य यंत्रणेसोबत समजून घेऊन गावकऱ्यांना पुनर्वसन केंद्रात मिळणाऱ्या सोई-सुविधांची व बालक कसे बरे होऊ शकते याची माहिती दिली. त्यामुळे आता गावात जर कोणतेही बालक आजारी, कुपोषित असेल तर त्याला तात्काळ दवाखान्यात नेले जाते. अशा सक्रिय लोकप्रतिनिधींचे सहकार्य 'कॅन' प्रक्रिया राबविताना स्थानिक संस्था व यंत्रणेला मिळाले आहे.

कॅन या प्रकल्पात सरकारी अधिकारी, लोकप्रतिनिधी, पालक व लोकसमुदाय या चार स्तंभांना एकत्र आणून समाजातून कुपोषण कसे कमी करता येवू शकते हे प्रकल्पातील एक वर्षांच्या आकडेवारीतून झालेल्या बदलातून दिसून येते. जून २०१९ मधील आकडेवारीप्रमाणे आरमोरीतील तीव्र कुपोषित बालकांची टक्केवारी एकूण बालकांच्या तुलनेत ४.२१ टक्के इतकी होती तर कुरखेड्यातील ५.२८ टक्के होती. परंतु जून २०२० मध्ये आरमोरीतील कुपोषण १.२३ टक्के तर कुरखेड्यातील कुपोषण ३.०३ टक्के इतके कमी झाले आहे. अशा प्रकारे प्रकल्पामुळे बालकाच्या पोषणापासून आरोग्यापर्यंत जागृतीचे झालेले हे बदल सामुदायिक प्रक्रियेतून सुरू होऊन ८० गावांमधील घराघरात कमी कालावधीत पोहोचलेले आहे. समाजाच्या वागणुकीत बदल झाला की, असे बदल सातत्याने टिकून राहतात म्हणून अशी लोक चळवळ व्यापक व्हायला पाहिजे.

**- विजयालक्ष्मी वघारे,**
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, गडचिरोली
**- दिपाली सुधींद्र, सचिन साठे**
साथी संस्था, पुणे

मटा